**आरोपी पक्षातर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – सुनिल बळवंत बावनवार.

**वय** – ५९ वर्ष, **व्यवसाय** - सेवानिवृत्त,

**राहणार–** बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास – श्री. आर. एस. चव्हाण, वकील.**

**१.** मी दि. ०६.०४.१९८७ ते ३१.०५.२०२२ पर्यंत आजरा बँकेत नोकरी केली आहे. मी वीस वर्षापासून बँकेच्या वसुली विभागात कामाला होतो. माझ्याकडे निवृत्ती वेळी कायदा व वसुली विभाग होता. मी वसुली करिता बँकेच्या बाहेर जात होतो. मला वसुलीला जाण्यापूर्वी कर्जदाराला नोटीस दयावी लागते याची माहिती आहे. मी आरोपीच्या घरी ब–याचवेळा गेलेलो असल्यामुळे निश्चित तारीख सांगू शकत नाही. मला आरोपीने दि. ०१.०२.२०२२ रोजी पैसे भरू शकत नसल्यामुळे हप्ते पद्दत करून देण्यासाठी पत्र दिल्याचे माहिती आहे. आता मला दि. १०.०३.२०२२ रोजी आमच्या बँकेने आरोपीला दिलेलया पत्राची प्रत दाखवली त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. साक्षीदाराने सदर पत्र ओळखल्यामुळे त्याला **नि.क्र.ए. ३५** देण्यात येतो.

२. आरोपीने मला धनादेशावरील तारखेच्या दिवशीच तो धनादेश दिलेला होता. आरोपीने त्याच्या घरी धनादेश दिला होता. त्यावेळी माझ्यासोबत वसुली कर्मचारी आले होते. मला त्या दिवशी आरोपी कामाला गेलेला नसल्यामुळे घरी होता का याबाबत सांगता येणार नाही. आरोपी त्या दिवशी चालत फिरत होता. आरोपीने दि. ०१.०२.२०२२ रोजी त्याचा अपघात झाल्यामुळे तो पैसे भरू शकत नसल्याबाबत आमच्या बँकेला पत्र दिले होते. आरोपीने धनादेशातील मजकूर लिहिलेला होता. आरोपीच्या कर्जाबाबत धनादेशा व्यतिरिक्त इतर कागदोपत्री पुरावा आहे.

३. आमच्या बँकेचे स्वतःचे क्लिअरींग हाऊस आहे. नि.क्र. १७ च्या नोटीसीत कायदेशीर देणे लागत असल्याचा विशेष उल्लेख नाही. मला धनादेश घेण्यासाठी गेलो त्या दिवशी कोणता वार होता ते आठवत नाही. आरोपीने दि. ३०.०४.२०२१ पर्यंत आमच्या बँकेत ५,१९,०११/– रुपये भरले असून तो ११,०५,४५८/– रुपये रक्कम देणे बाकी लागत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला नोटीस पाठवलेल्या वकील शितल टी.

पाटील या आमच्या बँकेच्या कायदेशीर सल्लागार नाहीत. मला त्या कधीपासून आमच्या बँकेच्या सल्लागार आहेत याबाबत सांगता येणार नाही.

**४.** आरोपीने दहा वर्षाच्या मुदतीसाठी दि.०६–०८–२०१८ रोजी कर्जाची रक्कम घेतली होती. नि.२० च्या कर्ज मंजूरी पत्रामध्ये कर्जाच्या हप्त्याची रक्कम न भरल्यास संपूर्ण कर्ज रक्कम वसुल केली जाईल अशी बाब नमूद नाही. माझ्या व्यतिरीक्त निपाणी शाखेत कायदा व वसुली विभागात इतर कोणीही कार्यरत नव्हते. निपाणी शाखेपासून आरोपीचे घर २ कि.मी. अंतरावर आहे. नि.३५ प्रमाणे दि.१०–०३–२०२२ पर्यंत आरोपीकडे तीन लाख वीस हजार रुपये थकबाकी होती. मी आरोपीने वादातील धनादेश देण्यापूर्वी दोन ते तीन वेळा त्याच्या घरी गेलो होतो. आम्ही त्यावेळी आरोपीला कायदेशीर नोटीस दिली नव्हती.

**५.** आरोपीला घरतारण कर्ज देण्यात आले होते. आरोपीने दि.२९–०३–२०२१ पर्यंत कर्जाची अंशतः रक्कम भरली होती. आरोपीने दिलेल्या तारण मिळकतीचा विमा काढला जातो. मंजूरी पत्रातील अनु.क्र. ४ ची अट तारण ठेवलेल्या कोणत्याही वस्तूच्या विम्याबाबत असते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>तक्रारदारा तर्फे उलटतपास – श्री. डी. डी. आजगेकर, वकील.</u>**

**६.** नि.क्र. ३५ वरील पत्राप्रमाणे मागणी केलेली रक्कम त्या दिवशी पर्यंतच्या आरोपीच्या थकीत कर्ज रक्कमेबाबतची आहे. आरोपीने त्याच्या अपघाताची कागदपत्रे अर्जासोबत दिली नव्हती. आरोपीला दिलेल्या नोटीशीला त्याने वकीलांमार्फत उत्तर दिलेले नाही. कर्जदाराने वसुलीच्या गेल्यावर संपूर्ण रक्कमेचा धनादेश दिल्यास आम्हाला स्विकारता येतो. कर्जाचा हप्ता थकीत झाल्यास २ टक्के अतिरिक्त व्याज दर आकारण्याची बाब मंजूरी पत्रात नमुद आहे. आरोपीने दिलेल्या धनादेशातील तारखेला त्यातील रक्कम त्याच्या कर्ज खात्याप्रमाणे बँकेला येणे होती.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १३.०२.२०२६.
आजरा.

(आर. पी. थोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.